सकाळ पा.नं.२०

# उत्तन कचराभूमीला भीषण आग

भाईंदर, ता.१८ (बातमीदार) : उत्तन येथील धावगीच्या डोंगरावर असलेल्या कचराभूमीला शनिवारी (ता.१८) रात्री आठ वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागली. ही आग एवढी प्रचंड होती की लांबूनही आगीच्या ज्वाळा अगदी स्पष्टपणे दिसून येत होत्या. कचऱ्याला लागलेल्या आगीमुळे आसपासच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर धूर पसरला आहे. गेल्या दोन दिवस तापमानात मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे कचराभुमीत साठून राहिलेल्या कचऱ्याला आग लागली असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

घटनेची माहिती मिळताच मिरा भाईंदर महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या तीन गाड्या व एक पाण्याचा टँकर कचराभूमीवर पोहोचले. मात्र कचऱ्याला आतल्या बाजुने आग लागली असल्यामुळे त्यावर रात्री उशिरापर्यंत नियंत्रण मिळवणे शक्य झाले नव्हते. शहरात गोळा झालेला वर्गीकरण न झालेल्या मिश्र स्वरुपातील कचऱ्यावर प्रक्रिया होऊ शकत नसल्यामुळे तो उघड्यावरच साठवण्यात आला आहे. या साठून राहिलेल्या कचऱ्यात विषारी वायू तयार होत असून त्याला अधूनमधून आग लागण्याच्या घटना घडत असतात.



भाईंदर : कचराभूमीला लागलेली आग

सकाळ पु.पा.२०

# नालासोपाऱ्यात दीड वर्षाच्या मुलीचे अपहरण

नालासोपारा, ता. १८ (बातमीदार) : माथेफिरूकडून एका दीड वर्षांच्या मुलीचे अपहरण झाल्याची धक्कादायक घटना उघड झाली आहे. संशयित आरोपीला मुलीला घेऊन जाताना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात चित्रित झाला आहे. याबाबत आचोळा पोलिस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी चार स्वतंत्र पथके तयार करून तपासासाठी रवाना केल्याचे सांगण्यात आले. नालासोपारा पूर्वेकडील आचोळा डोंगरी येथून बुधवारी (ता. १५) सायंकाळी साडेपाच वाजता दीड वर्षांच्या मुलीला उचलून संशयित आरोपी घेऊन पसार झाल्याची माहिती आचोळा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक चंद्रकांत सरोदे यांनी दिली.

Scanned with CamScanner

पुढारी पा. नं. ३.

# अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई

मिरारोड : पुढारी वृत्तसेवा

मिरा-भाईंदर शहरात अवैधरित्या प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनावर वाहतूक पोलीस कारवाई करत असताना वाहनचालकांची संख्या वाढत आहे. अवैधरित्या प्रवासी वाहतुकीवर आळा घालण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून कारवाई करण्यात येत आहे. जानेवारी महिन्यात अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या ५६ वाहनांवर काशिमिरा वाहतूक पोलिसांनी कारवाई केली आहे.

मिरा भाईंदर शहरातून ठाणे, मुंबई, वसई, विरार या परिसरात जाणाऱ्या प्रवाशांची संख्या जास्त आहे. रेल्वे व शासकीय परिवहन बसमध्ये जास्त गर्दी असल्यामुळे अनेक प्रवाशी हे खाजगी वाहनांने प्रवास करतात. खाजगी वाहन चालक हे क्षमतेपेक्षा अधिक प्रवाशांना घेवून जात असतात.

पुढारी पा. नं. ६.

# नालासोपाऱ्यात सात लाखांची चोरी उघड

## सुरत विमानतळावरून आरोपीस अटक

नालासोपारा: पुढारी वृत्तसेवा

नालासोपारा पूर्वेकडील प्रगती ७ लाख रुपयांची चोरी करून नेपाळ येथे पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस सुरत विमान तळावरून ताब्यात घेऊन आरोपीकडून ५,६५,००० जप्त करण्यात गुन्हे शाखेला यश आले आहे. तुळींज पोलीस ठाणे हद्दीत १३ फेब्रुवारी २३ रोजी दुपारी २.३० ते ३.०० वाजताच्या सुमारास सरोजा यादव यांच्या शिवसाई अपार्टमेंट ठाकूर विद्यालयाजवळ प्रगतीनगर घरामधील हॉलच्या टेबलाखाली ७ लाख रुपये असलेली बॅग घेऊन आरोपी नवीन बलराम विस्ट याने पैसे घेऊन फरार झाला असल्याची तक्रार दिल्यानंतर नवीन बलराम विस्ट याचा शोध घेत असताना, तांत्रिक माहिती तसेच गुप्त माहितीच्या आधारे माहिती घेतली असता आरोपी हा सुरत विमानतळावरून नेपाळ येथे पलायन करण्याच्या तयारीत असताना, विमानतळावरुन आरोपी नवीन बलराम विस्ट सुरत विमानतळावरून ताब्यात घेऊन त्याच्या ताब्यातून गुन्ह्यात चोरी केलेली रोख रक्कम ५,६५,००० रुपये हस्तगत केली असून, आरोपीत याने उर्वरीत रोख रक्कमेतून महागडा आयफोन किंमत १,५०,००० व कपडे यावर खर्च केले आहेत. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

Scanned with CamScanner

पुढारी पा.नं.५.

# विरार-शिरसाड प्रवासादरम्यान महिलेचे लाखोंचे दागिने लंपास

## चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात झाले कैद



**खानिवडे : पुढारी वृत्तसेवा**
नातेसंबंधांतील लग्न उरकून घरी परतणाऱ्या एका महिलेचे बस प्रवासात असताना लाखोंचे दागिने चोरीला गेल्याची घटना घडली आहे. दागिन्यांमध्ये १ लाख २० हजारांचा हजारांचा तीन फेऱ्यांचा राणी हार आणि सुमारे ३ लाखांचा गंठण असा समावेश आहे. विरार ते शिरसाडदरम्यान बस प्रवास करताना ही चोरी झाल्याची तक्रार मांडवी पोलिसांत दाखल करण्यात आली असून सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दिसणाऱ्या संशयित महिलांचा शोध पोलीस घेत आहेत.

यावाबत सविस्तर माहिती अशी आहे की, वसई पूर्वेतील भाताणे गावचे रहिवासी असलेले अशोक कासार आणि त्यांची पत्नी अर्चना हे दाम्पत्य दहिसर मुंबईतील आपल्या मुलीच्या नातेवाईकांच्या लग्नाला १५ फेब्रुवारीला गेले होते. तेथील १६ फेब्रुवारीचे मिरारोड येथे असलेले लग्न उरकून दुपारी ट्रेनने विरार येथे आले आणि आपल्या घरी भाताणे येथे जाण्यासाठी शिरसाड येथपर्यंत प्रवासासाठी महापालिकेच्या परिवहन बसमध्ये बसले. या दरम्यान सौ. कासार यांनी लग्नकार्यात परिधान करण्यासाठी नेलेला सोन्याचा राणीहार आणि गंठण लग्न हॉलमधून बाहेर पडताना एका डबीत ठेवून ती पर्समध्ये ठेवलेले दागिने सुरक्षित आहेत की नाही, हे तपासले होते. सदर बस मार्गातील रायपाडा येथे आली असताना चार महिलांसमवेत एक लहान ८ ते १० वर्षांचा मुलगा चढला. बस सुरू होताच सौ. कासार यांच्या सीटजवळ पायाखाली पैसे पडल्याचे सांगून त्या मुलाने शोधण्यास सुरुवात केली. तर एक महिलाही शोधू लागली. यावेळी त्या महिलांनी गोंधळ घालून पर्सला अनेक वेळा स्पर्श केला असल्याचे सौ. कासार यांनी तक्रारीत म्हटले आहे.

लोकमत पा. नं. ५.

# सात लाख चोरून नेपाळला पळणार होता

## सुरत विमानतळावरून आवळल्या मुसक्या



आरोपीकडून ५ लाख ६५ हजारांची रक्कम व मुद्देमाल हस्तगत केला.

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : सात लाख रुपयांची चोरी करून नेपाळ येथे पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला सुरत विमानतळावरून तुळींज गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी ताब्यात घेतले. आरोपीकडून ५ लाख ६५ हजारांची रोख रक्कम व दीड लाखांचा आयफोन व कपडे हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले.

प्रगती नगरच्या शिवसाई अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या सरोजा यादव (४०) यांच्या घरातील टेबलखालून ७ लाख रुपयांची रोख रक्कम असलेली बॅग नवीन बिस्ट याने चोरी केली होती. तक्रार आल्यावर तुळींज पोलिसांनी तपासाला सुरुवात केली. गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांना बिस्ट सुरत येथे असल्याची माहिती मिळाली. आरोपी नेपाळला विमानाने पळून जाण्याच्या तयारीत असताना सुरक्षा अधिकाऱ्यांच्या मदतीने त्याला ताब्यात घेतले. ही कामगिरी पोलिस उपायुक्त सुहास बावचे, सहायक पोलिस आयुक्त चंद्रकांत जाधव आणि तुळींजचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे साहाय्यक निरीक्षक मिथुन म्हात्रे, उपनिरीक्षक बाळासाहेब बांदल, साहाय्यक उपनिरीक्षक शिवानंद सुतनासे, पोलिस हवालदार आनंद मोरे, उमेश वरठा, आशपाक जमादार, पांडुरंग केंद्रे, शशी पाटील, बागुल, छबरीबन, राऊत यांनी केली आहे.

Scanned with CamScanner

म. टा. पा. नं. १५१२.

# शिक्षकेतर कर्मचारी संपावर ठाम

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

राज्यातील अकृषी विद्यापीठे आणि कॉलेजांतील शिक्षकेतर कर्मचारी उद्या, सोमवारपासून होणाऱ्या बेमुदत काम बंद आंदोलनावर ठाम आहेत. त्यामुळे मंगळवारपासून सुरू होणाऱ्या बारावीच्या परीक्षेवर बहिष्काराचे सावट कायम आहे.

राज्य सरकारबरोबर झालेल्या बैठकीत मान्य करण्यात आलेल्या निर्णयाशी इतिवृत्तातील मुद्दे विसंगत असल्याची भूमिका आंदोलक संघटनांनी घेतली आहे. त्यामुळे बैठकीत मान्य केलेल्या मागण्या इतिवृत्तात स्पष्टपणे दिल्या जात नाहीत, तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नसल्याचे 'महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समिती'ने जाहीर केले आहे.

महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीतील पदाधिकाऱ्यांची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत १५ फेब्रुवारीला बैठक पार पडली होती. या बैठकीत सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजना कायम ठेवणे, सातव्या वेतन आयोगाच्या फरकाची १ जानेवारी २०१६ पासून देय असलेली थकबाकी विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मान्य करणे, विद्यापीठातील १,४१० शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करणे, विद्यापीठ व (पान १२वर)

# शिक्षकेतर कर्मचारी संपावर ठाम

(पान एकवरून)
महाविद्यालयांतील रिक्त जागा भरण्यास परवानगी देणे आदी मागण्या मान्य करण्यात आल्याचा दावा संघटनेने केला आहे. मात्र, बैठकीचे इतिवृत्त सरकारने १७ फेब्रुवारीला संघटनांना दिले. या इतिवृत्तात मागण्या मान्य केल्याचे स्पष्टपणे नमूद करण्यात आले नाही. तसेच या मागण्या मान्य करण्याचा विहीत कालावधी नमूद केला नाही. त्यातून याबाबत संदिग्धता निर्माण होत आहे. तसेच सरकारबरोबर झालेल्या चर्चेनुसार इतिवृत्तात बदल करून ठोस आश्वासन मिळत नाही. तोपर्यंत २० फेब्रुवारीपासून सुरू केले जाणारे आंदोलन मागे घेतले जाणार नाही, अशी भूमिका संघटनेचे मुख्य संघटक मिलिंद भोसले यांनी घेतली आहे.

'विद्यार्थ्यांना वेठीला धरून आंदोलन करण्याची आमची मानसिकता नाही. आम्ही सरकारला १३ जानेवारीला नोटीस दिली होती. मात्र, त्यावर काहीच झाले नाही. परिणामी मंगळवारपासून सुरू होणाऱ्या बारावीच्या परीक्षांसह सर्व परीक्षांवर बहिष्कार केला जाणार आहे. तसेच प्रशासकीय कामही केले जाणार नाही,' असेही भोसले यांनी स्पष्ट केले. परिणामी बारावीच्या परीक्षा होणार की, नाही या संभ्रमात पालक आणि विद्यार्थी आहेत. तसेच यावर सरकारने तत्काळ तोडगा काढावा, अशी मागणी केली जात आहे.

Scanned with CamScanner

लोकमत

# हजारोंचे अमली पदार्थ जप्त

नालासोपारा : येथे मॅफेड्रॉन हा अमली पदार्थ जप्त करण्यात आचोळे पोलिसांना यश आले आहे. शुक्रवारी रात्री साडेआठच्या सुमारास आचोळे गांधी निर्वाणा बिल्डींगजवळ पोलिसांनी मोहम्मद कुरेशी (४७) व ओके सीमा (५३) या दोन आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून ३६ हजार रुपये किमतीचा अठरा ग्रॅम वजनाचा अंमली पदार्थ तसेच मोबाइल फोन व रोख रक्कम असा ५१ हजार ७०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. आहे. आचोळे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 1 Feb 19, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

# रात्री दोननंतर रस्त्यांवर फिरतो कोण? भिकारी, रिकामेच जास्त

## वसई, विरारच्या १० पोलिस ठाण्यांच्या हद्दीत रात्रीची गस्त सुरू

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : वसई शहरात घरफोड्या, वाहनचोरी, जबरी चोरीचे गुन्हे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. अनेक वेळा रात्रीच्या वेळी बंद फ्लॅट फोडले जातात. चोरटे दुचाकीवरून फिरून शहरात गुन्हे करत असल्याचे आढळून आले आहे. शहरात सध्या पोलिस उपायुक्तांच्या नेतृत्वाखाली स्थानिक पोलिस ठाण्याअंतर्गत रात्रीची गस्त घातली जाते.

प्रत्येक सहायक पोलिस आयुक्त विभागामध्ये पोलिस निरीक्षक व पोलिस ठाण्याच्या हद्दीत बीट मार्शलची गस्त असते. शहरात प्रवेशासाठी असणाऱ्या मुख्य रस्त्यांवरही गस्त घातली जाते. रात्री दोन ते पहाटे चार या कालावधीत चौक तसेच रस्त्यांवरून वाहने तुरळक ये-जा करतात. याच वेळेत गुन्हे घडण्याची शक्यता असते. त्यामुळे शहरात विनाकारण रात्री फिरणाऱ्यांची पोलिस चौकशी करतात. संशय आल्यावर ताब्यात घेण्यात येते. त्यामुळे रात्री एकनंतर विनाकारण रस्त्यावर फिरू नका, असे पोलिसांनी आवाहन केले आहे. प्रत्येक पोलिस ठाण्याच्या हद्दीत रात्रीची गस्त सुरू आहे.




**१** प्रगती नगर चौक रात्री २ वाजता : या चौकात रात्र असो की दिवस नेहमीच याठिकाणी वर्दळ असते. रात्रीची २ वाजून २२ मिनिटांनी येणाऱ्या शेवटच्या लोकललाही नागरिक कामावरून घरी येतात. पण यावेळी अनेक रिकाम टेकडे तरुणही रात्रीच्या वेळी रस्त्यावर फिरत असतात.

रात्रीच्या वेळी विनाकारण कोणीही रस्त्यावर फिरू नये. रात्रीच्या वेळी घडणाऱ्या गुन्हेगारीवर अंकुश ठेवण्यासाठी रात्रीची गस्त वाढविण्यात आली आहे. संशयास्पद कोणी आढळले तर त्यांची कसून चौकशी केली जात आहे. त्यामुळे विनाकारण रात्रीच्यावेळी रस्त्यावर फिरू नका. - पोलिस प्रशासन

### रात्री फिरण्याची ही काय कारणे झाली ?

- रात्री एकनंतर फिरणाऱ्यांना पोलिसांनी हटकले. शतपावली करतोय, आताच कामावरून घरी आलोय, येथे जवळच माझे घर आहे, घरी कोणी नसल्याने बाहेर जेवणासाठी गेलेलो, गावावरून फोन आल्याने फोनवर बोलण्यासाठी घराबाहेर आलो आहे, तब्येत बरी नाही म्हणून मेडिकलमध्ये औषध घेण्यासाठी आलो आहे, अशी कारणे फिरणारे पोलिसांना सांगतात.



### या भागांवर रात्री पोलिसांचे अधिक लक्ष

- स्थनिक पोलिस दररोज रात्रीच्या वेळी गस्त घालत असतात. ज्या भागात घरफोडी, दुचाकी चोरी होतात त्या भागांवर पोलिस अधिक लक्ष घालतात. तसेच ज्या परिसरात गुन्हेगारी प्रवृत्तीचे आरोपी आहेत त्याठिकाणीही लक्ष ठेवतात.

### डायल ११२ हेल्पलाइनची वाहनेही गस्तीवर

- प्रत्येक पोलिस ठाण्याच्या हद्दीत डायल ११२ हेल्पलाइनचे चारचाकी वाहन आणि बीट मार्शल दुचाकी घेऊन रात्री गस्त घालत असतात. आयुक्तालयाअंतर्गत प्रत्येक स्थानिक पोलिस ठाण्यात वाहनांसह पोलिसांचा मोठा फौजफाटा रात्रीच्या वेळी गस्तीवर असतो.



Scanned with CamScanner

लोकमत

# 'उत्कृष्ट उकल' पुरस्काराने सहा पोलिस अधिकाऱ्यांचा सन्मान

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : पतीच्या हत्येची पत्नीने दिलेली सुपारी, बोलण्यात गुंतवणूक एटीएम बदलून फसवणूक करणारी चौघांची टोळी, घरफोडी करणारा आरोपी आदी विविध गुन्ह्यांची उकल करणाऱ्या सहा पोलिस अधिकाऱ्यांना पोलिस आयुक्त मधुकर पांडे यांच्या हस्ते जानेवारी महिन्यातील 'उत्कृष्ट उकल' अर्थात बेस्ट डिटेक्शनचा पुरस्कार देऊन गौरविले.

पोलिस निरीक्षक शाहूराज रणवरे, पोलिस निरीक्षक कैलाश बर्व्हे, पोलिस निरीक्षक प्रमोद बडाख, पोलिस निरीक्षक वसंत लब्दे, सायबर विभागाचे पोलीस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर, मिरा रोडचे पोलीस निरीक्षक विजयसिंह बागल आणि गुन्हे शाखा १ चे पोलीस निरीक्षक अविराज कुराडे अशी पुरस्कार मिळालेल्या सहा जणांची नावे आहेत.



उत्कृष्ट उकल पुरस्काराने सन्मानित पोलिस अधिकारी डावीकडून वसंत लब्धे, प्रमोद बडाख, कैलास बर्व्हे, शाहूराज रणवरे आदी.

## पत्नीने दिली होती पतीच्या हत्येची सुपारी

गोरेगाव परिसरात राहणाऱ्या कमरुद्दीन अन्सारी हा अनैतिक संबंधात अडसर ठरत असल्याने पत्नी आशिया हिने एक लाख रुपयांना हत्येची सुपारी दिली. आरोपी बिलाल ऊर्फ मुल्ला पठाण याला २१ जानेवारीला सुपारी देऊन २० हजार रुपये दिले होते. याप्रकरणी गुन्हे शाखा २ चे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शाहूजी रणावरे यांना गौरविले.

## आंतरराज्य टोळी जेरबंद

१ लोकांना बोलण्यात गुंतवून एटीएमची अदलाबदली करून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या चार आरोपींच्या आंतरराज्य टोळीला पेल्हारच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी पकडले होते.

२ उपनिरीक्षक सनिल पाटील व यांच्या टीमने आरोपी विकी पंडित साळवे, विकी यानखेडे, अनिल येलदोंडे आणि वैभव महाडीक या चौघांना पकडले. वरिष्ठ पोलिस निरीक्षक वसंत लब्दे यांचा त्यासाठी सत्कार केला.



Scanned with CamScanner

लोकमत

# रस्ते गुळगुळीत म्हणून वाहन पळवाल, तर दंड!

## अनेक वाहनचालक करतात वेगमर्यादेचे उल्लंघन

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : मुंबई-अहमदाबाद या मुंबई आणि गुजरात राज्यांना जोडण्याच्या प्रमुख महामार्गावर वेगमर्यादेचे नियम डावलून वाहने धावत आहेत. त्यामुळे अनेकदा वाहनांवरील ताबा सुटून अपघात झाल्याच्या घटनादेखील वाढल्या आहेत.

महामार्गावरून रोज मुंबई ते गुजरात आणि गुजरात ते मुंबई अशी हजारो वाहने या मार्गावरून धावतात. दरम्यान, वाहनांच्या वेगावर निर्बंध असावेत यासाठी महामार्ग पोलिसांकडून स्पीडगन व्हॅनच्या माध्यमातून कारवाई केली जाते. यामध्ये जर महामार्गावरील वाहन हे मर्यादेपेक्षा जास्त वेगाने असेल तर स्पीडगनद्वारे त्या वाहनांचा नंबर व गती नोंद केली जाते, तसेच संबंधित वाहनधारकावर ऑनलाइन दंडात्मक कारवाई केली जाते. यामुळे महामार्गावर स्पीडगन दिसताच अनेक वाहनांची वेगमर्यादा कमी होते. दरम्यान, दंडाची रक्कम १५ दिवसांत भरण्यासंदर्भात संबंधिताला संदेश पाठवला जातो.



### वेगमर्यादेचे उल्लंघन केले म्हणून किती दंड ?

| | |
|---|---|
| दुचाकी-तीनचाकी | १,००० रु. |
| ट्रॅक्टर | १,५०० रु. |
| चारचाकी | २,००० रु. |

### राज्य-राष्ट्रीय महामार्गावर वाहने सुसाट

मुंबई-अहमदाबाद महामार्गावरून राज्यासह दुसऱ्या राज्याच्या गाड्या, मालवाहतूक ट्रक, कंटेनर भरधाव वेगाने ये-जा करतात. या महामार्गावर वाहतूक कोंडीची समस्या होत असल्याने गर्दीच्या काही ठिकाणी उड्डाण पूल बांधले आहेत. वाहतूक पोलिसांनुसार महामार्गावर होणाऱ्या बहुतेक दुर्घटना माणसांच्या चुकीमुळे होतात. गाडी ओव्हर टेक करणे, जास्त काळ ड्रायव्हिंग करणे, गाडी चालवताना डुलकी लागणे, वेगाने-नशेत गाडी चालविणे अशी कारणे आहेत.

### दीड महिन्यात ४१ लाखांचा दंड

वाहन हे मर्यादेपेक्षा जास्त वेगाने चालवणाऱ्यांवर महामार्ग पोलिसांकडून दररोज कारवाई केली जात आहे. १ जानेवारी ते १६ फेब्रुवारीदरम्यान भरधाव व अतिवेगाने वाहने चालविणाऱ्या २ हजार ५६ वाहनांवर दंडात्मक कारवाई करून ४१ लाख १७ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

### एक किलोमीटरवरून वाहनांचा मोजला जातो वेग

महामार्गावर अतिवेगात असलेल्या वाहनांचा वेग एक किलोमीटर अंतरापर्यंत मोजला जातो. वेगमर्यादा ओलांडली असेल तर 'स्पीडगन'द्वारे त्या वाहनांचा व्हिडीओ आणि फोटो संपादित केले जातात. त्यानंतर ऑनलाइन चालान होते आणि आरसी नंबरवरून संबंधितांना दंड आकारला जातो.

### ओव्हरस्पीड वाहने चालवणाऱ्यांना लावला जातो दंड

वरिष्ठांच्या आदेशानुसार आणि मार्गदर्शनाखाली महामार्गावरील भरधाव वेगातील वाहनांवर स्पीडगनच्या मदतीने वाहनांचा वेग रोखला जातो. जी वाहने ओव्हर स्पीड चालवतात त्यांना दंड ठोठावण्यात येतो.

- विठ्ठल चिंतामण, पोलिस उपनिरीक्षक, महामार्ग पोलिस केंद्र, चिंचोटी



Scanned with CamScanner

समय भास्कर

# देसी बंदूक और सात जिंदा कारतूस के साथ दो गिरफ्तार

पंकज दुबे/ मीरा-भाईंदर

मीरा भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय के अंतर्गत आने वाले वालीव पुलिस स्टेशन के क्राइम ब्रांच यूनिट ने एक देसी बंदूक और 7 जिंदा कारतूस के साथ दो लोगों को गिरफ्तार कर लिया है। पुलिस को गुप्त सूचना मिली थी कि कुछ लोग हथियारों की खरीदी -बिक्री करने के लिए आने वाले है, जिस पर पुलिस ने संज्ञान लेते हुए जाल बिछाया और इस मामले में 2 लोगों को गोलाणी नाका वसई पूर्व से गिरफ्तार कर लिया, पुलिस ने आरोपियों के पास से अवैध देसी बंदूक, धारदार हथियार, । जिंदा कारतूस, और एक एक्टिवा सहित लाखों का सामान भी आरोपियों के पास से बरामद किया है यह कार्य परिमंडल 3 के पुलिस उपायुक्त सुहास बावचे तथा परिमंडल 2 के अतिरिक्त कार्यभार चंद्रकांत जाधव के मार्गदर्शन में क्राइम ब्रांच के पुलिस निरीक्षक कैलाश बर्वे, मिलिंद साबले, और उनकी टीम ने किया हथियार की खरीदी बिक्री करने की मंशा सामने नहीं आ पायी है, पुलिस ने आरोपियों पर धारा 3, 4, 25, और महाराष्ट्र पुलिस अधिनियम 1951, कि धारा 37(1), (3), 115 के तहत मालमा दर्ज कर आगे कि कार्रवाई कर रही है।

Scanned with CamScanner

मुंबई, ठाणे, पालघर येथून प्रसिद्ध आणि ... रत्नागिरी, पुणे, नाशिक येथून वितरीत

द ग्लोबल टाइम्स



सोमवार दि. २० फेब्रुवारी २०२३ | पालघर आवृत्ती | वर्ष : ०४ | अंक : १७६ | पाने : ०८ | किंमत : ₹३.००

# गावठी कटटा व दोन जिवंत काडतूसासह एका आरोपीस घेतले ताब्यात

नालासोपारा : एक इसम तुळींज स्मशानभूमीजवळ नालासोपारा पूर्व येथे अग्निशस्त्र खरेदी विक्री करण्याकरीता येणार असल्याची गोपनीय माहीती त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत मिळाली होती. मिळालेल्या गोपनीय माहीतीच शहनिशा करून पुढील कायदेशिर कारवाई करण्यासाठी तुळींज पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक शैलेंद्र नगरकर सो यांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहा. पोलीस निरिक्षक एम. डी. म्हात्रे यांना सुचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अमलदार यांनी नालासोपारा पूर्व, तुळींज स्मशान भूमीजवळ सापळा रचुन आरोपी इसम नामे जियालाल विजयराज जयस्वाल यास एक गावठी फटा ६०२ काडतुसे असा एकुण ११,०००/- रुपये किमतीच्या मुददेमालासह ताब्यात घेतले. नमुद आरोपी थाने विनापरवाना स्वतःच्या कब्जात अग्निशस्त्र व दोन जिवंत काडतुसे बाळगल्याने त्याचेविरुध्द तुळींज पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र. १४०/२०२३ भारतीय हत्यार कायदा कलम ३,२५ (१) (अ) सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कामगीरी सुहास बावचे पोलीस उप आयुक्त सो परीमंडळ-२ वसई, चंद्रकांत जाधव सहाय्यक पोलीस आयुक्त सो, तुळींज विभाग, तुळींज पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेंद्र नगरकर, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे सहा. पोलीस निरिक्षक एम.डी. म्हात्रे पोउनिरी/बाळासाहेब बांदल, सहा. पो.उप निरी / शिवानंद सुतनासे, पो. हवा / आनंद मोरे, पोहवा / उमेश चरा, पोहवा / १२०३१ आशपाक जमादार, पोहवा / १२०६२ पांडुरंग केंद्रे, पोशि/ १३०५२ छपरीचन, पोशि/ १३०४२ राऊत यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.



# पत्रकार: सदानंद कुलकर्णी

Scanned with CamScanner

लोकमत

# महाशिवरात्रीसाठी तुंगारेश्वर मंदिर सज्ज

## पोलिस, पालिका, मंदिर प्रशासनाची जय्यत तयारी

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : शनिवारी असणाऱ्या महाशिवरात्रीनिमित्ताने पालघर जिल्ह्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले तुंगारेश्वर मंदिर सज्ज झाले आहे. यासाठी पोलिस, महानगरपालिका, मंदिर आणि प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. यावेळी होऊ घातलेल्या कार्यक्रमात आणि दर्शनात कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे.

वसई पूर्वेकडील तुंगारेश्वर डोंगरावर असलेल्या तुंगारेश्वर मंदिरात भव्य महाशिवरात्री उत्सव साजरा होणार असल्याने दर्शन घेण्यासाठी लाखो भाविक येतात. यावेळी श्री तुंगारेश्वर देवस्थान विश्वस्त मंडळाने भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. रात्री १२ वाजण्याच्या सुमारास विविध मान्यवरांच्या हस्ते अभिषेक करून महाशिवरात्री उत्सवास सुरुवात होणार आहे. तुंगारेश्वर डोंगरावर महादेवाचे पुरातन मंदिर आहे. महाशिवरात्र व श्रावण महिन्यात वसई तालुक्यासह ठाणे, पालघर जिल्ह्यांतून येथे लाखो भक्त येतात. तुंगारेश्वराचे दर्शन घेतानाच येथील निसर्गाचाही आनंद भाविक घेतात.



तुंगारेश्वर मंदिरात मोठा बंदोबस्त लावण्यात येणार आहे. भाविकांच्या सुरक्षेचीही काळजी घेणार आहोत. एकाच ठिकाणी जास्त गर्दी होणार नाही, याचीही दक्षता घेतली जाणार आहे.

- कैलाश बर्वे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, वालीव पोलिस ठाणे

महाशिवरात्रीसाठी मंदिर प्रशासन झाले आहे. भाविकांनी दर्शनाला येताना जंगलात आग लागणार नाही, प्लास्टिकचा वापर टाळून जंगल स्वच्छ कसे राहील व कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी दक्षता घ्यावी.

- रमेश घोरकाना, अध्यक्ष, श्री तुंगारेश्वर देवस्थान विश्वस्त मंडळ



Scanned with CamScanner

# अमली पदार्थ पिणाऱ्या दोघांना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** पेल्हार पोलिसांनी गुरुवारी रात्री कातकरी पाडा आणि धानीव बाग परिसरात अंमली पदार्थ पिणाऱ्या दोन आरोपींना पकडले आहे. इम्तियाज खान (३५) आणि आदित्य ठाकूर (१९), अशी पकडलेल्या दोन आरोपींची नावे आहेत. पेल्हार पोलिसांनी दोन गुन्हे दाखल करून दोन्ही आरोपींना अटक केले आहे.

Hello Vasai
Page No. 2 Feb 18, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner